**आर बी आय / २००५-०६/२४१**
**आर पी सी डी. पी एल एन एफ एस. बी सी. सं. ५६/०६.०२.३१/ २००५-०६**

डिसेंबर २७, २००५

अध्यक्ष / कार्यकारी निदेशक (संचालक)
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(क्षेत्रीय ग्रामीण बँका व स्थानीय क्षेत्र बँकासहीत)

प्रिय महोदय,

**लहान कर्जदारांसाठी एक रकमी तडजोड योजना आणि नवीन कर्ज पात्रता**

ज्या कर्जदारांचे मुद्दल रु. २५००० पर्यंत वा त्यापेक्षा कमी आहे व जी कर्जे ३०.९.२००५ रोजी संदिग्ध व नुकसान परी संपत्ति अशी वर्गीकृत झाली आहेत अशा लहान कर्जदारांना त्यांचे बँकेबरोबरचे अनुपयोग्य खाते निपटून नवीन कर्ज उभे करण्यास पात्र होण्यासाठी सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांना (क्षेत्रीय ग्रामीण बँका व स्थानिक क्षेत्र बँकासहीत) एक रकमी तडजोडी साठी सरल यंत्रणा उपलब्ध करण्यासाठी सूचित करण्यात येत आहे.

२. शासन पुरस्कृत योजनेच्या अंतर्गत दिलेल्या कर्जांच्या संदर्भित बँकानी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकी मध्ये विशिष्ट राज्यांसाठी वेगवेगळे दृष्टिकोण ठेवून नवीन दिशानिर्देश तयार करावेत.

३. फसवणूक व सार्वजनिक विश्वासघाता चे मामले या यंत्रणेत समाविष्ट नाहीत.

४. ज्या कर्जदारांची खाती या यंत्रणे खाली निपटली जातील ते कर्जदार नवीन कर्ज उभारण्यास पात्र ठरतील.

५. बँकानी योग्य ती योजना तयार करुन ती कार्यरत करण्यासाठी उचित उपाय योजावेत.

६. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासु
**(जी.एस. श्रीनिवासन)**
मुख्य महा व्यवस्थापक